**अतित्वर्य / महत्वाचे**

अति. महापालिका आयुक्त (ज) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र.साप्रवि/आस्था/प्र-४/ ६५५० 
दिनांक :२२/१२/२०२०

## कार्यालयीन आदेश

विषय :- कोरोना विषाणू (Covid 19) चे प्रतिबंधासाठी करावयाचे लसीकरणासाठी प्रशासकीय विभागांचे अंतर्गत कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांची माहिती सादर करणेबाबत.

विषयाचे अनुषंगाने मे. राज्य शासन स्तरावरून (Covid 19) चे प्रतिबंधासाठी करावयाचे लसीकरणासाठी पुणे महानगरपालिका सेवांमधील कोव्हीड संबंधित सेवेत नियुक्त कर्मचारी, घनकचरा व व्यवस्थापन अंतर्गत कार्य करणारे कर्मचारी, कोव्हीडविषयक सेवेसाठी थेट संपर्कात असलेले अभियंता, महसुली आणि इतर विभागातील महापालिका कर्मचारी, वाहन चालक, परिवहन सेवेतील बस चालक व वाहक, वॉटर टँकर चालक, स्मशानभूमीत सेवा देणारे कर्मचारी इ. कर्मचाऱ्यांची माहिती सोबतचे विहित नमुन्यामध्ये पाठविणेबाबत कळविण्यात आले आहे.

सदर विहित नमुन्याची छायांकित प्रत या पत्रासोबत माहितीसाठी दिलेली आहे, ईमेलने पाठविलेली आहे.

तरी, आपले कार्यालयाकडील उपरोक्त कर्मचाऱ्यांची आवश्यक माहिती इंग्रजी (Font : Arial Unicode MS) Excel Sheet मध्ये भरण्यात यावी. सदरची माहिती हि, महत्वाची व अतित्वर्य स्वरुपाची असून, आपले कार्यालयाकडील समन्वय अधिकारी यांचे नाव व संपर्क क्रमांकासह सदरची माहिती **asthapanainfo@gmail.com** या ईमेलवर दिनांक २४ डिसेंबर २०२० पूर्वी पाठविण्यात यावी.

Rubal 22/12/2020

(रुबल अग्रवाल)
अति. महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका